# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र
# दिनांक - 08/06/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

प्रति,

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

जावक क्रमांक :- पोअय/डिपी 31-बी-2/संलग्न-495/ 4423 /2020
पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांचे कार्यालय एल.आय.ची चौक यवतमाळ
दूरध्वनी क्रमांक :- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

यवतमाळ, दिनांक :- 08 JUN 2020

---

**आदेश**

**पोहवा/495 संतोष ढाकरगे नेमणुक, पो.स्टे यवतमाळ ग्रामीण** यांना प्रशासकिय कारणास्तव पो.स्टे वडगांव जंगल येथे संलग्न करण्यात येत आहे.

प्रभारी अधिकारी यांनी वर नमुद पोलीस कर्मचारी यांना तात्काळ संलग्नचे ठिकाणी हजर होणे कामी कार्यमुक्त करावे.

(एम. राज कुमार)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

ठाणेदार पो.स्टे यवतमाळ ग्रामीण/वडगांव जंगल

प्रत,

आस्थापना लिपीक/वेतन लिपीक-1/सआलि-1/राजपत्र लिपीक यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहिस्तव

महाराष्ट्र पोलीस
जावक क्रमांक :- पोअय/आलि-80 सी/आजिंब/पो.कर्म-हजर/2020 / 14405
पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांचे कार्यालय एल.आय.सी चौक यवतमाळ
दूरध्वनी क्रमांक :- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
यवतमाळ, दिनांक :- 8 JUN 2020

## आ दे श

या कार्यालयाचे पत्र क्रमांक पत्र पोअय/सआली-80 सी/आंजिव /स्विकृती/3608/2020 दिनांक 20/04/2020 व पोअय/सआली-80 सी/आंजिव/स्विकृती/1382/2020 दिनांक 31/01/2020 अन्वये मा.पोलीस आयुक्त नागपुर शहर अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना या आस्थापनेवर नमुद पदावर आंतरजिल्हा बदली करिता स्विकृती देण्यात आलेली आहे.

त्यानुसार मा.पोलीस आयुक्त नागपुर शहर यांचे पत्र क्रमांक पोआना/आस्था/सआली-02/कार्यमुक्त/आंजिव/8721/2020 दिनांक 03/06/2020 अन्वये नमुद पोलीस कर्मचारी यांना पोलीस अधिक्षक, यवतमाळ या घटकात आंतर जिल्हा बदली वर हजर होणे करिता कार्यमुक्त करण्यात आल्याने ते या आस्थापनेवर नमुद दिनांकास हजर आले आहेत.

सदर कर्मचारी यांची सेवाजेष्ठता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक 6/236/87 दिनांक 16/2/1987 अन्वये लावण्यात येईल.

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना या घटकात आंतर जिल्हा बदलीवर हजर करुन घेण्यात आले असुन त्यांना खालील प्रमाणे रिक्त बंन देण्यात येवुन पोलीस मुख्यालय, यवतमाळ येथे नेमणुक करण्यात येत आहे.

| अ.क्र | पोलीस कर्मचारी यांचे नाव, पदनाम व बंन | स्विकृतीचे पद | देण्यात आलेला रिक्त बंन | हजर दिनांक |
|---|---|---|---|---|
| 01 | पोहवा/55 मन्सुर अहेमद खान | पोहवा | 19 | 08/06/2020 |
| 02 | पोशि/6948 संदिप चव्हाण | पोलीस शिपाई | 281 | 06/06/2020 |
| 03 | पोशि/3785 तालीब समीउल्ला खान | पोलीस शिपाई | 02 | 08/06/2020 |

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक यवतमाळ

प्रति,
01) पोहवा/19 मन्सुर अहेमद खान 02) पोशि/281 संदिप चव्हाण 03) पोशि/02 तालीब समीउल्ला खान

मार्फत :- पोलीस नियंत्रण कक्ष, यवतमाळ/राखीव पोलीस नियंत्रण कक्ष, यवतमाळ

प्रत :- वेतन लिपीक-1/आस्थापना लिपीक-1/राजपत्र लिपीक / भविष्य निर्वाह निधी लिपीक /वस्त्र भांडारपाल, राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीस :- पोलीस उपअधिक्षक (मुख्या) यवतमाळ

प्रत अग्रेपित- :- मा.पोलीस आयुक्त नागपुर शहर

2/- विनंती की, नमुद कर्मचारी यांचे सेवापट परिपुर्ण नोंदीसह या कार्यालयास सत्वर पाठविण्यात यावे.

# भाग २ - रजा

क्र.पोअय/पलि-२/अ.रजा/२०२० 4421 यवतमाळ ,दि. - 8 JUN 2020

**आदेश**

श्रीमती आयशा रब कश्रेली हयांच्या मुलीचे लग्न असल्याने त्यांना दि.९.६.२०२० ते १९.६.२०२० एकुण ११ दिवस अर्जीत रजा मुख्यालय सोडण्याचे परवानगी सह मंजूर करण्यात येत आहे,त्यांच्या रजेच्या काळात त्यांचे कडे असलेल्या कामकाजाचा अतिरीक्त कार्यभार श्री.पदमाकर कांबळे कश्रेली यांचे कडे सोपविण्यात यते आहे.
**(मा.पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)**

-8.6.

**(एम.एम.बागवान )**
**पोलीस उपअधिक्षक मुख्यालय**
**पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता**

प्रति,

१. श्रीमती आयशा रब कश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ
२. श्री.पदमाकर कांबळे कश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

प्रत : पोउअधीक्षक मुख्यालय यवतमाळ /प्रमुख लिपीक आस्थापना शाखा /डिपीजी लिपीक

क्र.पोअय/पलि-२/अ.रजा/हजारे /२०२० 4416 यवतमाळ ,दि. - 8 JUN 2020

**आदेश**

श्री.अभिजीत हजारे कश्रेली यांना घरगुती काम असल्याने त्यांना दि.१८/६/२०२० ते २६/६/२०२० पर्यंत एकुण १९ दिवस अर्जीत रजा शासकिय सुटीला जोडुन मुख्यालय सोडण्याचे परवानगी सह मंजूर करण्यात येत आहे,त्यांचे रजेच्या काळात त्यांचे कडे असलेल्या कार्यसनास अतिरीक्त कार्यभार श्री.ओमदेव कुंडलवार कश्रेली यांचे कडे सोपविण्यात यते आहे.
**(मा.पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)**

(सुशिला पवार )
प्र.कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक यवतमाळ
करीता

प्रति,

१. श्री.अभिजीत हजारे कश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ
२. श्री.ओमदेव कुंडलवार कश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

- 8 JUN 2020

क्रमांक :डीपी/३१-बी २/हजर/ पोका २५७६ देवनारे/ 4417 /२०२० यवतमाळ दिनांक

## आ दे श

पोका/२५७६ सुदर्शन देवनारे, नेमणुक पो.स्टे.घाटंजी हे दि.४/११/२०१९ ते ७/६/२०२० पावेतो एकुण २१७ दिवस वरीष्ठांना कोणतीही पुर्व सुचना न देता कर्तव्यावर अनधिकृत गैरहजर असल्याने यांनी सादर केलेल्या विनंती अर्ज व आज्ञांकीत कक्षात केलेल्या विनंती नुसार आज दि. ८/६/२०२० रोजी यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यात येत आहे.

तसेच दिनांक दि.४/११/२०१९ ते ७/६/२०२० पावेतोचा एकुण २१७ दिवस गैरहजर कालावधी हा "असाधारण रजा (विनावेतन रजा )" मंजुर करण्यात येत आहे.

(मा.पो.अ.यांचे आदेशान्वये)

८.६.

(एम.एम.बागवान)
पोलीस उपअधिक्षक,(मुख्या)
पो.अ.कार्या.यवतमाळ.

प्रति,

ठाणेदार,पो.स्टे.घाटंजी

प्रत - वेतन लिपीक -१/स.आस्था लिपीक-५/डिपीजी लिपीक/पोका-२५७६ सुदर्शन देवनारे (घाटंजी ) यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव

क्रमांक :पोअय/आशा-4/बा.सं.रजा/मपोना-1731 अपर्णा / 4418 /2020 यवतमाळ दिनांक

# आदेश

शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक संकिर्ण-2017/प्र.क्र.25/सेवा-6 दिनांक 23.07.2018 चे शासन निर्णयानुसार खालील नमुद महीला पोलीस कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्या कालावधीकरीता त्यांच्या मुलगा/मुलीच्या संगोपनाकरीता विशेष बालसंगोपन रजा खालील अटी व शर्तिच्या अधिन राहुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पो.कर्मचारी यांचे नाव पदनाम व ब.नं. | नेमणुक | अपत्यांची संख्या | रजा कोणत्या अपत्याकरीता | मंजुर बालसंगोपन रजा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 01 | मपोना/1731 अपर्णा जाधव | कल्याण शाखा यवतमाळ | 01 | 01 | 24.06.2020 |

अटी व शर्ती :-

06) मुलांचे वय 18 वर्ष होईपर्यंत सदर रजा लागु राहील

07) एका वर्षामध्ये कमाल दोन महीण्याच्या कमाल मर्यादेत सदर रजा घेता येईल.

08) पहील्या दोन जेष्ठतम हयात मुलाकरीता सदर रजा लागु राहील.

09) उपरोक्त महीला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाणाच्या लगतपुर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढेच रजा वेतन देण्यात येईल.

10) सदर कालावधीत रजा प्रवास सवलत अनुज्ञेय ठरणार नाही.

(मा.पोलीस अधिक्षक यांचे मान्यतेने)

(सुशिला पवार)
प्र.कार्यालय अधिक्षक
पोलीस अधिक्षक यवतमाळ करीता

प्रती

प्रभारी अधिकारी कल्याण शाखा यवतमाळ

प्रत : मपोना/1731 अपर्णा जाधव,मार्फत : प्रभारी अधिकारी कल्याण शाखा यवतमाळ

प्रत :राजपत्र लिपीक यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस

4422

क्रमांक :- पोअय/सआलि-1/अर्जीत रजा-पो.कर्मचारी-2020-2021 /2020 यवतमाळ, दिनांक :- 8 JUN 2020

## आ दे श

खालील नमुद कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे त्यांची रजा,म.ना.सेवा (रजा) नियम 1981 मधील नियम 51 अन्वये सन **2020-2021** करिता त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रामणे अर्जीत रजा मंजूर करण्यांत येत आहे.

| अ.क्र | पदनाम ब.न. | नेमणूक | मागितलेली रजा व दिवस | कारण |
|---|---|---|---|---|
| 01 | पोशि/46 नरेन्द्र बगमारे | पो.स्टे.अवधुतवाडी | 30 दिवस | धार्मीक कार्याकरिता |
| 02 | पोशि/118 विनोद आडे | पो.स्टे.अवधुतवाडी | 30 दिवस | धार्मीक कार्याकरिता |
| 03 | सपोउपनि/388 विजय भगत | पो.मु.यवतमाळ | 30 दिवस | धार्मीक कार्याकरिता |
| 04 | पोहवा/334 रुद्राम जाधव | पो.मु.यवतमाळ | 30दिवस | धार्मीक कार्याकरिता |
| 05 | सपोउपनि/190 अलकानंद काळे | पो.स्टे.आर्णी | 30 दिवस | धार्मीक कार्याकरिता |
| 06 | पोहवा/101 गणेश डोगरे | पो.मु.यवतमाळ | 30 दिवस | धार्मीक कार्याकरिता |
| 07 | पोशि/353 रोशन देवतळे | पो.मु.यवत. | 30 दिवस | धार्मीक कार्याकरिता |
| 08 | पोना/251 संजय जाधव | पुसद शहर | 15 दिवस | धार्मीक कार्याकरिता |
| 09 | सपोउपनि/462 सुनिल शुक्ला | पो.स्टे.अवधुताडी | 30 दिवस | धार्मीक कार्याकरिता |
| 10 | पोना/228 गजानन दुधकोहळे | पो.स्टे.अवधुताडी | 30 दिवस | धार्मीक कार्याकरिता |
| 11 | पोना/72 बाबा गायकवाड | पो.मु.यवतमाळ | 30 दिवस | धार्मीक कार्याकरिता |
| 12 | पोशि/372 निलेश आठवले | पो.मु.यवतमाळ | 30 दिवस | स्वता:च्या लग्नाकरिता |
| 13 | मपोशि/65 शितल चव्हान | पो.स्टे. दिग्रस | 30दिवस | स्वता:च्या लग्नाकरिता |

नमुद पोलीस कर्मचारी यांना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पाहुन त्यांनी तसेव कामाची निकट पाहुन आळीपाळीने रजेवर सोडल्याची तारीख न चूकता या कार्यालयास कळवावी

8/6.

(एम. एम. बागवान)
पोलीस उप अधिक्षक (मुख्या)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ करिता

प्रति,

ठाणेदार:- पो.स्टे.अवधुतवाडी/आर्णी/पुसद शहर/दिग्रस/पो.मु.यवतमाळ

प्रत :- डिपीजी लिपीक यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहिस्तव

क्रमांकः-सआली-५/५१-डी अ.रजा/विविध/ 4366 २०२०/ यवतमाळ दिनांक 8 JUN 2020

आदेश

खालील नमुद पोलीस कर्मचा-यानी त्यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे त्यांची रजा, म.ना.सेवा (रजा)नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये सन २०२०-२०२१ या वित्तिय वर्षाकरीता अर्जित रजा मंजूर करण्यात येत आहे. सदर कर्मचा-यांना कामाची निकड पाहुन आळीपाळीने रजेवर सोडावे .

| अ.क्र. | पो.कर्म.यांचे नाव ब.न. | नेमणुक पो.स्टे. | मंजूर रजा | रजा मंजुरीचे कारण |
|---|---|---|---|---|
| १. | पोकॉ/2504,सचिन नैताम | लाडखेड | 30 दिवस | स्वत:चे लग्ना करीता |
| २ | पोशी/2516,विकास कमनर | लोहारा | 30 दिवस | स्वत:चे लग्ना करीता |

56.

(एम.एम.बागवान)

पोलीस उपअधिक्षक (मुख्या)

पोलीस अधिक्षक यवतमाळ करिता

प्रति:-

सर्व संबधित ठाणेदार/डिपीजी लिपीक यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

डीपीजी

क्र.पोअय/पलि-२/अ.रजा/राणे /२०२० 4396 यवतमाळ ,दि. 8 JUN 2020

## आदेश

श्री.प्रविण राणे वश्रेली हे अमरावती येथे राहत असलेला परिसर कोरोना मुळे सिल केला असल्याने त्यांना **दि.४/६/२०२० ते १८/६/२०२० पर्यंत एकुण १५** दिवस अर्जीत रजा शासकिय सुटीला जोडुन मुख्यालय सोडण्याचे परवानगी सह मंजूर करण्यात येत आहे,त्यांचे रजेच्या काळात त्यांचे कडे असलेल्या पलि-५ या कार्यसनास अतिरीक्त कार्यभार श्री.ताराचंद धारगावे व श्रेली यांचे कडे सोपविण्यात यते आहे.

**(मा.पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)**

**(एम.एम.बागवान )**
**पोलीस उपअधिक्षक मुख्यालय**
**पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता**

प्रति,

१. श्री.प्रविण राणे वश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

२. श्री.ताराचंद धारगावे वश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

प्रत : पोउअधीक्षक मुख्यालय यवतमाळ /प्रमुख लिपीक प्रबंधक शाखा /डिपीजी लिपीक

C:\Documents and Settings\Administrator\Desktop\LEAVE NOT SHEET-2020.docx



क्र.पोअय/पलि-२/अ.रजा/देशमुख /२०२० 4395 यवतमाळ ,दि. 8 JUN 2020

## आदेश

श्री.परेश्वर देशमुख वश्रेली याना त्यांचे वडिलना वैद्यकीय उपचाराकरिता औरंगाबाद येथे घेवुन जाणे असल्याने त्यांना **दि.८/६/२०२० ते १२/६/२०२० पर्यंत एकुण ०५** दिवस अर्जीत रजा शासकिय सुटीला जोडुन मुख्यालय सोडण्याचे परवानगी सह मंजूर करण्यात येत आहे,त्यांचे रजेच्या काळात त्यांचे कडे असलेल्या प्रबंधक या कार्यसनास अतिरीक्त कार्यभार श्री मिलिंद खानदेशकर कश्रेली यांचे कडे सोपविण्यात यते आहे.

**(मा.पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)**

**(एम.एम.बागवान )**
**पोलीस उपअधिक्षक मुख्यालय**
**पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता**

प्रति,

१. श्री.परेश्वर देशमुख वश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

२. श्री.मिलींद खानदेशक कश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

प्रत : पोउअधीक्षक मुख्यालय यवतमाळ /प्रमुख लिपीक प्रबंधक शाखा /डिपीजी लिपीक

# भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

क्रमांक :- पोअय/आस्था-3/अ.र. रोखीकरण./ A388 /2020 यवतमाळ दिनांक :-

## आदेश

महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981 नियम 50 (1) बी व नियम क्रमांक 68 (1) मधिल तरतुदि नुसार तसेच शास निर्णय वित्त विभाग क्रमांक अ.रजा-2401/सेवा-9 दिनांक 15.01.2001 अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी हे त्यांच्या अर्जी रजे खाती शिल्लक असलेल्या अर्जीत रजेचे रोखीकरण करण्यात मंजुरी देण्यात येत आहे

| अ.क्र. | नाव पदनाम व ब.नं. | सेवानिवृत्त/मयत दिनांक | शिल्लक रजा | शेवटचे वेतन |
|---|---|---|---|---|
| 01 | स्वे. से.नि. सफौ/ 2421, चंदू मुत्यालकर | स्वे.से.नि. 30.03.2020 | 218 दिवस | 49600/- |

( एम. राज कुमार )
पोलीस अधिक्षक, यवतमाळ

प्रति,

वेतन लिपीक - 1 यां-ना योग्य कार्यवाही करीता

प्रत :-जिल्हा कोषागार अधिकारी /पेन्शन लिपीक/राजपत्र लिपीक यांना माहितीस योग्य कार्यवाहिस्तव

# भाग ५ - शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

क्र.:डीपी/३१-बी -२ /पो.उप.नि-संजय शिंदे/अंआ/4390/२०२० यवतमाळ दिनांक - 8 JUN 2020

वाचा :- १) उप.वि.पो.अ दारव्हा यांचा कसुरी अहवाल पत्र क्र. २०७३ दिनांक १२/०९/२०१९

२) वाचक शाखा का.दा.नो क्र. वाचक/का.दा.नो/पोउपनिशिंदे/ २०१९/१२६५यवतमाळ दिनांक ०६/१०/२०१९

अंतीम आदेश

कसूरदार :- **पो.उप.नि/संजय विश्वनाथ शिंदे, नेमणुक पो.स्टे. यवतमाळ ग्रामिण.**

कसूरी :-

आपण पो.स्टे. दारव्हा येथे नेमणुकीस असतांना, पो.स्टे.दारव्हा येथे दाखल गुन्हा अप.क्र. ७७२/२०१९ क. १४३,१४७,१४८,१४९,४५२,३२४,४३६ भादंवि सह १३५ मपोका या गुन्हयाचा तपास आपणा कडे होता. सदर गुन्हयातील तपासात आपण अत्यंत हलगर्जीपणा केल्याच्या खालील प्रमाणे स्पष्ट होते.

१) सदर गुन्हयातील घटना दिनांक १४.१०.२०१८ रोजी ०९:३० वा. घडली असुन, त्याचा पंचनामा दिनांक १५.१०.२०१८ रोजी २२:४५ वा. करण्यात आला आहे. तसेच घटना गंभरी स्वरुपाची असल्याने घटनास्थळ पंचनामा दोन शासकीय पंचा समक्ष करणे बंधनकारक होते. परंतु आपण शासकीय पंच घेतले नाही. किंवा शासकीय पंचासाठी कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसुन येत नाही. तसेच घटनास्थळ पंचनाम्या मध्ये घटनास्थळी घरातील कोणकोणते साहीत्य, सामान जळाले, त्याच्या किंमती किती ? याबाबत कोणताही उल्लेख नाही.

२) दिनांक १५.१०.२०१८ रोजी घटनास्थळ पंचनामा केला आहे. त्यावेळी घटनेचे गांभीर्य लक्षात घेता त्यांनी त्याच वेळी स्वत: फिर्यादी होवून किंवा श्रीमती कमलाबाई दिगांबर तोटे यांची तक्रार घेवून गुन्हा दाखल करणे क्रमप्राप्त होते. परंतु आपण तसे केले नाही.

३) सदर गुन्हयामध्ये साक्षीदारांना लोखंडी रॉडने मारहाण केल्याबाबत तक्रारीत नमुद आहे. त्या अनुषंगाने गुन्हा दाखल झाल्यानंतर, साक्षीदारांनी वैद्यकीय तपासणी करणे गरजेचे होत. परंतु वैद्यकीय तपासणी केल्याचे दिसून येत नाही. तसेच आपण गुन्हयातील आरोपींना अटक करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसुन येत नाही.

उपरोक्त प्रकरणी आपण सदर गुन्हयाचे तपासात प्रकरण योग्य प्रकारे कायदेशीररीत्या न हाताळता त्यामध्ये दिरंगाई करुन, कर्तव्यात केलेला निष्काळजीपणा व हलगर्जीपणाबाबत आपणांस "दोन(२) वर्ष वेतनवाढ स्थगिती "(अपरीणामकारक) या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन स्पष्टिकरण सादर केले. सादर केलेले स्पष्टिकरण अशंत: समाधानकारक वाटल्याने, व तुमच्या कर्तव्य

सुधारण्याची ही एक संधी देवुन, व शिक्षा कमीं करुन प्रस्तावित शिक्षेमध्ये अशंत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्या येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक यवतमाळ याव्दारे, पो.उप.नि/संजय शिंदे, नेमणुक पो.स्टे. यवतमाळ ग्रामिण यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत "एक (१) वर्ष वेतनवाढ स्थगिती "(अपरीणामकारक) ~~आर्थिक दंडाची~~ शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

( एम.राज कुमार )
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

प्रति,

पो.उप.नि/संजय शिंदे नेमणुक पो.स्टे. यवतमाळ ग्रामिण

मार्फत :- ठाणेदार पो.स्टे. यवतमाळ ग्रामिण

२) सदर आदेशाची मूळ प्रति संबंधितांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवून दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रत :- वेतन लिपीक-२/ अधिकारी आस्थापना लिपीक / डीपीजी लिपीक यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस.

8 JUN 2020

कमांकः पोअय/लेखा/पोकनि./एकलव्य योजना/ 4391 /2020 यवतमाळ दिनांक

संदर्भ :– पोमस/28अे/4937/उद्योजकता व कौसल्य विकास/79/2018 दि.31/05/2018

विषय :– एकलव्य योजना–उद्योजकता व कौसल्य विकास योजना राबविण्याबाबत

---000---

**प्रस्तावना**

महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस कर्मचारी यांचे मुलास/पती/पत्नीस शासकीय नोकरी अभावी स्वःताचा व्यवसाय सुरु करता यावा तसेच सदर व्यवसाय/उदयोगधंदा सुरु करण्यासाठी आर्थीक पाठबळ देण्याचे उद्देशाने व पोलीस कर्मचारी यांचे कुटुंब आर्थीक दृष्टया सक्षम करण्यासाठी मा.पोलीस महासंचालक म.रा.मुबंई यांचे कार्यालयाकडुन एकलव्य योजना–उद्योजकता व कौसल्य विकास योजना सुरु करण्यात आली आहे.

**आदेश :–**

मा.पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुबंई यांचे वरील संदर्भीय पत्रान्वये नमुद अटी व शर्तीचे अधीन राहुन खालील प्रमाणे नमुद पोलीस कर्मचारी यांचे पत्नीस त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे एकलव्य योजना–उद्योजकता व कौसल्य विकास योजना योजनेअंतर्गत रक्कम मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव | नेमणुक पो.स्टे. | ज्याच्यासाठी कर्ज घेत आहात त्यांचे नाव व नाते | कोणते व्यवसाया करीता कर्ज घेत आहे. | मंजुर रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | नापोकॉ/1069 उमेश अरविंद पिसाळकर | पो.स्टे.लोहारा | सौ.निता उमेश पिसाळकर (पत्नी) | किरकोळ वस्तु विक्री | रु.100000/– एक लाख रु. |

**अटी व शर्ती :–**

1) सदर योजना ही महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई ते साहायक पोलीस उपनिरीक्षक यांचे 18 वर्षावरील पाल्य,पोलीस कर्मचारी यांचे पती किवा पत्नी यांचे करीता **अग्रीम तत्वावर तसेच परत फेडकरण्याचे तत्वावर लागु** राहील याची संबधीत कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.

2) सदर अग्रीम मंजुर करतांना पोलीस निरीक्षक, पोलीस कल्याण शाखा यांना संबधीत अर्जदार हे ज्या जागेवर उदयोग सुरु करणार आहे. त्या जागेस भेट देवुन, जागेची परिस्थीत, उदयोग सरु करणा–याची योग्यता इत्यादी बाबीची बारकाईने पडताळणी करुन सदर बाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करतील.

3) वरीलप्रमाणे अहवालाचे अनुषंगाने अर्जदाराच्या पाल्यास, पती/पत्नीस मुलाखती करीता तसेच वाटल्यास पडताळणी करीता या कार्यालयास बोलविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

4) सदर अग्रीम संबधीत अर्जदारास अदा केल्या नंतर **06 महिण्याचे** कालावधीनंतर वरील प्रमाणे पत्रात नमुद केल्या प्रमाणे **त्यांचे वेतनातुन 18 मासिक हप्त्यात** सदर अग्रीमाची वसुली करण्यात येईल. व सदर परतफेडीची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहील.

5) अर्जदार ज्या जागेत उदयोग सुरु करणार आहे,त्या जागेचे भाडेकरारनामा अथवा गुमास्ता लायसेन्स व इतर आश्यक कागदपत्रे अर्जदारास या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

6) पोलीस विभागाच्या जागेवर उदयोग किवा व्यवसाय करणेकरीता या निधीचा वापर करता येणार नाही.

7) **सदर योजनेचा लाभ घेतल्यानंतर 03 महिण्याच्या आत लघुउदयोग किवा व्यवसाय सुरु न केल्यास अविा योजनेचा गैरवापर केल्याचे दिसुन आल्यास संबधित पोलीस कर्मचा–याकडुन वार्षीक 12% व्याजदराने सर्व रक्कम 04 मासिक हप्त्यात वसुल केली जाईल,यांची नोंद घ्यावी.**

(एम.राज.कुमार)
पोलीस अधिक्षक यवतमाळ

प्रति,

1. नापोकॉ/1069 उमेश अरविंद पिसाळकर पो.स्टे.लोहारा
   मार्फत प्रभारी अधिकारी पोस्टे.लोहारा

प्रत:– प्रभारी अधिकारी पोस्टे.लोहारा सदरची प्रत संबधितास प्रत अदा करुन पोच या कार्यालयास सादर करावी

**प्रत :– वेतन लिपीक– 01/रोखपाल**

वरील प्रमाणे नमुद पोलीस कर्मचारी यांचे माहे 08/2020 चे वेतनामधुन रु.5565/– चा एक हप्ता तसेच माहे 09/2020 ते 01/2022 चे वेतनामधुन एकुण 17 हप्त्यात रु.5555/– प्रमाणे नियमितपणे न चुकता वसुल करण्यात येवुन पोलीस कल्याण निधीमध्ये वळती करणेबाबत कार्यवाही करावी.

प्रत :– पोलीस निरीक्षक पोलीस कल्याण शाखा यवतमाळ

उपरोक्त योजनेचे लाभार्थी कर्मचा–याचे वेगळा अभिलेख/रजिस्टर करुन त्यामध्ये सदर कपात बाबत नियमित नोंदी घेण्यात याव्यात व प्रत्येक महिण्याचे शेवटी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत :– अपोअ/पोउपअधि.मुख्या/का.अ./प्रलि लेखा/आस्थापना लिपीक/सआली–03/डिजीपी